**जिल्हा परिषदेच्या गट-क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांच्या धोरणाची अंमलबजावणी.**
**मान्यताप्राप्त संघटनेबाबत स्पष्टीकरण**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**शासन पूरकपत्र क्र.: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४२३/आस्था-१४**
२५, मर्झबान पथ, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : २० सप्टेंबर, २०२२.

**वाचा** : १) शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४, दि.१५/०५/२०१४.
२) शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४, दि.०२/०७/२०१४.
३) शासन निर्णय क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४, दि.०२/०१/२०१७.
४) शासन पत्र क्र.डिईएन-२०१८/प्र.क्र.१६४/आस्था-१२, दि.१०/१०/२०१८.
५) शासन निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४, दि.०७/०३/२०१९.
६) शासन निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४, दि.०८/०३/२०१९.

**शासन परिपत्रक :**

शासनाने दि.१५/०५/२०१४ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेच्या गट-क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांचे सर्वसमावेशक धोरण, कार्यपध्दती व निकष निश्चित करण्यात आले असून त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या प्रकरण ५ मध्ये बदल्यांसाठी नेमणूकीचा पदावधी बदलणे व बदल्यांचा कालावधी वाढविणे किंवा कमी करणे याबाबत तरतूद असून त्यात एखादा कर्मचारी नियमानुसार **मान्यताप्राप्त** आणि राज्य / जिल्हा पातळीवरील प्रतिनिधी असलेल्या जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष, सरचिटणिस, कोषाध्यक्ष आणि कार्याध्यक्ष असेल अशा चार कर्मचाऱ्यांचा पदावधी वाढवता येईल, असे नमूद आहे.

२. राज्यातील जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलेले गट-क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) चे कर्मचारी हे शासकीय सेवक किंवा शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांच्या नेमक्या कोणत्या संघटना मान्यताप्राप्त संघटना म्हणून विचारत घ्याव्यात, तसेच अशा संघटनांना मान्यता प्रमाणपत्र देण्याची तरतूद काय असावी, याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य व विधि व न्याय विभाग यांनी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन संबंधित कर्मचारी संघटनांना त्यांच्या संघटनेस औद्योगिक न्यायालयाकडून मान्यता मिळविण्याची कार्यवाही करण्याबाबत, संबंधित कर्मचारी संघटनांना कळविण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना शासनाकडील संदर्भाधीन क्र. ४) येथील दि.१०/१०/२०१८ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या (शिक्षक वगळून) कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संघटना Maharashtra Recognition of Trade Union and Prevention of Unfair

Practice Act, १९७१ च्या कलम १२ नुसार औद्योगिक न्यायालयाकडून मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. याप्रकारे औद्योगिक न्यायालयाने **मान्यता** दिलेल्या आणि राज्य / जिल्हा पातळीवरील प्रतिनिधी असलेल्या जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष, सरचिटणिस, कोषाध्यक्ष आणि कार्याध्यक्ष असेल अशा चार कर्मचाऱ्यांचा (संघटनेचे पदाधिकारी) पदावधी शासन निर्णय दि.१५/०५/२०१४ मधील तरतूदीनुसार वाढवणे आवश्यक आहे. त्यामुळे उक्त दि.१४/०५/२०१४ च्या शासन निर्णयाच्या प्रकरण ५ मधील परिच्छेद १ (अ)(४) अधिक स्पष्टीकरणासह खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे. सबब, उक्त शासन निर्णयातील प्रकरण ५ मधील परिच्छेद १ (अ)(४) मधील सुधारित तरतूद खालीलप्रमाणे राहील :-

*"जिल्हा परिषद (शिक्षक वगळून) कर्मचाऱ्यांच्या **नियमानुसार मान्यताप्राप्त संघटना** म्हणजे ज्या संघटना Maharashtra Recognition of Trade Union and Prevention of Unfair Practice Act, १९७१ अंतर्गत औद्योगिक न्यायालयाकडून मान्यता प्राप्त संघटना होय. अशाप्रकारे मान्यताप्राप्त राज्य / जिल्हा पातळीवरील प्रतिनिधी असलेल्या जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष, सरचिटणिस, कोषाध्यक्ष आणि कार्याध्यक्ष असेल अशा चार कर्मचाऱ्यांचा (संघटनेचे पदाधिकारी) पदावधी वाढविता येईल. त्याचा पदावधी जिल्हा मुख्यालयी पदाधिकारी म्हणून निवड झाल्यापासून जास्तीत जास्त (प्रशासकीय कालावधी १० वर्षे + वाढीव कालावधी ५ वर्षे) वर्षापर्यंत वाढविता येईल. तसेच, बदली झाल्यानंतर त्या ठिकाणी सदर पदाधिकाऱ्याने पाच वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर व तो पदाधिकारी म्हणून कार्यरत असल्यास त्याला पुन्हा तालुक्याच्या गावी / जिल्हा मुख्यालयी नेमणूक देता येईल."*

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२२०९२०१४४१३७९९२० असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

**(का. गो. वळवी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री (ग्रामविकास) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्य / विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
१२) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१३) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, पोर्ट, मुंबई.
१४) निवडनस्ती कार्यासन आस्था.१४, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.